जनसंपर्क कक्ष
05 NOV 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर'विषयक डॉ. सोनकवडे यांच्या संशोधनास पेटंट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधि-विभागातील डॉ. आर जी. सोनकवडे यांच्या 'मायक्रोवेव्ह इंड्यूस्ड केमिकल इचिंग ऑफ एलआर-१५ टाइप-२, सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर' या महत्त्वपूर्ण संशोधनाला राष्ट्रीय पेटंट जाहीर झाले आहे. तब्बल दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे पेटंट जाहीर झाले आहे.

डॉ. सोनकवडे हे विद्यापीठात रुजू होण्यापूर्वी इंटरयुनिव्हर्सिटी ॲक्सिलरेटर सेंटर, नवी दिल्ली येथे कार्यरत होते. तेव्हापासून ते संशोधन करीत होते. मायक्रोवेव्ह लहरींचा वापर करून साधारणपणे किती किरणोत्साराची मात्रा एखाद्या व्यक्तीसाठी पुरेशी ठरेल आणि त्यायोगे न्यूक्लिअर ट्रॅक व्यवस्थितरीत्या पाहणे सुलभ व्हावे, या दिशेने हे संशोधन केंद्रित आहे. न्यूक्लिअर ट्रॅक व्यवस्थित पाहता आले तरच किरणोत्सर्गाची मात्रा अचूक प्रमाणात दिली गेली आहे की नाही, हे समजू शकते. उदा. कर्करोगपीडित रुग्णावर उपचार करताना किरणोत्साराची मात्रा जशी अचूक द्यावी लागते, अगदी त्याचप्रमाणे येथेही तशीच काळजी घेणे अनिवार्य ठरते. तसेच चुकीच्या किरणोत्सर्ग मात्रेचे अनेक दुष्परिणाम मानवावर होऊ शकतात. याकरिता किरणोत्सर्गाचे अचूक प्रमाण मिळविण्याकडे त्यांनी संशोधन केंद्रित केले. या अभिनव संशोधनासाठीचा संपूर्ण खर्च आय.यू.ए.सी.चे तत्कालीन संचालक डॉ. अमित रॉय यांनी संस्थेमार्फत केला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी डॉ. सोनकवडे यांचे अभिनंदन केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ 'एनएसएस' विभागाकडून रंकाळा परिसरात स्वच्छ भारत अभियान

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वच्छ भारत अभियान युवा व खेळ मंत्रालय यांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाने रंकाळा येथे स्वच्छता अभियान राबविले. ७०० पेक्षा अधिक प्लास्टिक बॉटल व इतर ८० किलो प्लास्टिक संकलन करण्यात आले. अभियानांतर्गत रंकाळ्याच्या तांबट कमानीच्या आजूबाजूच्या परिसरात असलेले प्लास्टिक संकलन केले गेले. कोल्हापूर, सांगली, सातारा येथे एकाचवेळी स्वच्छता करण्यात आली. प्लास्टिक संकलन उपक्रम प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक अभय जायभाये यांच्या उपस्थितीत झाला.